# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## परिपत्रक क्र. १२७/२०२५

**विषय :- विद्यापीठाच्या / एस.एस.सी. बोर्डाच्या अथवा अन्य संस्थांच्या शैक्षणिक वर्ष सन २०२५-२०२६ मध्ये विविध अभ्यासक्रमांच्या परीक्षांना बसण्यासाठी परवानगीबाबत.**

स्वत:ची शैक्षणिक पात्रता वाढविण्याच्या दृष्टीने ज्या सेवकांना वर नमूद केलेल्या परीक्षेस बसावयाचे असेल अथवा नाव नोंदणी करावयाची असल्यास संबंधित सेवकाने कार्यालयाची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक आहे. सदर परवानगी दिल्यामुळे त्यांना नेमून दिलेल्या नियमित कार्यालयीन कामावर कोणताही परिणाम होणार नाही, तसेच परीक्षेस बसण्यासाठी कोणत्याही प्रकारची विशेष सवलत दिली जाणार नाही, या प्रमुख अटींवर परवानगी देण्याचा विचार केला जाईल. तरी ज्या सेवकांना परीक्षांना बसावयाचे असेल/नाव नोंदणी करावयाची असेल त्यांनी परवानगी मिळण्यासाठीचा अर्ज मा.प्रशासकीय शाखाप्रमुख/विभागप्रमुखांमार्फत प्रशासन शिक्षकेतर विभागास **सोमवार, दिनांक ९ जून, २०२५** पूर्वी पाठवावा.

**अर्जामध्ये परीक्षेचे नाव व नियमित अथवा बहि:स्थ याचा स्पष्ट उल्लेख करावा**. मुदतीनंतर आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

गणेशखिंड, पुणे ४११ ००७.
जावक क्र. एएन/ 1585
दिनांक : 14 MAY 2025

(प्रा.(डॉ.)ज्योती भाकरे)
प्रभारी कुलसचिव

**प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी :-**

१. सर्व शैक्षणिक विभागप्रमुख
२. मा.संचालक, सर्व प्रशाला
३. सर्व प्रशासकीय शाखाप्रमुख

यांना विनंती की, सदर परिपत्रक आपल्या विभागातील संबंधित सेवकांच्या निदर्शनास आणावे.

E:\2025\Exam Permmision\MAY 2023\Exam Circular.docx